JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय ज्ञान परंपरा आणि संस्कृत

**संशोधक विद्यार्थी**
सौ.प्राजक्ता आनंद बुडईकर (कुकडकर)

**मार्गदर्शिका**
प्रा.डॉ. जयश्री अ. सकळकळे
सहयोगी प्राध्यापक व संस्कृत विभाग प्रमुख
शंकरलाल खंडेलवाल कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अकोला.

**प्रस्तावना**

भारतामध्ये शिक्षणाची परंपरा ही फार पूर्वीपासूनच चालत आलेली आहे. ज्ञान आणि संस्कृत ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत असं म्हणावं लागेल कारण पूर्वापार चालत आलेले ज्ञान हे संस्कृत या भाषेमधूनच आपल्याला प्राप्त झालेले आहे. प्राचीन काळापासूनच शिक्षानीती मनुष्याला प्रोत्साहित करणारी होती. पुराणातील ज्ञानाला अत्यंत महत्त्व मानलेले आहेत. भारतामध्ये तक्षशिला, नालंदा, काशी इत्यादी विश्वातील प्रसिद्ध शिक्षा आणि संशोधनाचे प्रमुख केंद्र आहे.

"भारतस्य प्रतिष्ठा द्वे संस्कृत संस्कृतीस्तथा"[1]

भारत घडण्याचे मूळ कारण संस्कृत आणि संस्कृती आहे. संस्कृती हे जीवनाचा आधार आहे तर संस्कृत ही तिला जोडून ठेवण्याचे माध्यम आहे. या दोन शब्दांची दृढता भारतीयांना ज्ञानरूपी प्रकाशाकडे नेण्याचे कार्य करत असतात. भारतीय परंपरेचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय ज्ञानापरंपरा आणि संस्कृत याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पारंपारिक ज्ञान हे सूत्र रूपाने सिद्धांतिक रूपाने ग्रंथांमध्ये लिखित स्वरूपात आहे. ग्रंथांमधून वेगवेगळे शास्त्रतत्त्वज्ञान सांगितले जाते आणि अशा ग्रंथबद्ध ज्ञानाला भारतीय ज्ञान असे म्हटले जाते. भारतीय ज्ञान परंपरा फार प्राचीन आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही इतक्या वर्ष टिकून आहे त्याअर्थी त्यामध्ये काहीतरी नक्कीच तत्व असणार यात शंका नाही. आज सुध्दा ही ग्रंथ वाचावेसे वाटते त्याअर्थी त्यामध्ये काहीतरी नूतन नवीन आहे. त्यामुळेच वाचत असताना त्यामधून प्रत्येक नवनवीन अर्थ कळत जातो. भारतीय ज्ञान परंपरा ही शेकडो वर्षापासून चालत आलेली परंपरा आहे. भारतीय ज्ञान ही एक पर्वणी आहे. त्याच्यात मुख्य भाषा ही संस्कृत भाषा आहे. आपल्याला प्रत्येक राष्ट्रातील ज्ञान आत्मसात करायचे असेल तर सर्वप्रथम ती भाषा येणे आवश्यक आहे. शिक्षण शास्त्रातील जे ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत.त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सर्वामध्ये शिरोमणी ग्रंथ म्हणजे पतंजली योग सूत्र शिक्षणाबाबत मानस, अंतिमानस या दोन दृष्टीने विचार झाला आहे. मानसशास्त्रीय रीतीने विचार करणे शिक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे त्याशिवाय शिक्षणाचा आरंभच होत नाही परंतु सुरुवातीला मानसशास्त्र आवश्यक असले तरी शेवटी कुठपर्यंत जायचे आहे. हे समजण्यासाठी अति मानस भूमिकेचे ही ज्ञान होणे गरजेचे आहे. मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी तसेच मानसिक समाधान लाभण्यासाठी, तसेच जीवनातील कठीण प्रसंगी योग्य निर्णय घेण्याकरिता भगवद्गीता हा उपदेशात्मक ग्रंथ आहे. कारण जीवनात जगावं कसं आणि येणाऱ्या परिस्थितीशी सामोरे कसे जावे याचा योग्य मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. ज्यामध्ये व्यक्ती कितीही अडचणीत असेल तर त्यामधून आपल्याला मार्ग दाखवण्याचा काम भगवद्गीता हा ग्रंथ करतो.

पतंजली योगशास्त्रात वृत्तींचे परीक्षण करून वृत्तीने अनुकूल कसे वागावे आणि वृत्तीच्या पलीकडे जाऊन कसे वागावे या दोन्ही गोष्टी सांगितल्या आहेत. वृत्तींना अनुकूल वागलो नाही तर जगात कोणतीही काम करता येणार नाही आणि वृष्टीच्या पलीकडे जाऊन विचार केला नाही तर तटस्थ दर्शन होत नाही. पतंजली परमेश्वराला गुरूरूपात पाहतात.

"सः एष पूर्वेषामपि गुरूः"[2]

जे प्राचीन ज्ञानी होऊन गेले, त्यांचा तो गुरु आहे. कोणत्याही धर्मग्रंथात आणि मानसशास्त्राच्या ग्रंथात परमात्म्याला गुरूरूपात पाहिले गेलेले नाही. सामान्यतः त्यांच्या पित्याच्या मातेच्या रूपात पाहिले जाते. परंतु योगाशास्त्राने त्याला गुरूच्या रूपात पाहिले आहे परमेश्वर केवळ गुरु नाही, तर परमगुरू आहे. तो सर्वांना शिक्षण देतो. प्राचीन काळी असे होते की, गुरुच्या जवळ जाऊन एखाद्या विद्यार्थ्याने केवळ विद्यार्जन केले तर तो फक्त विद्या स्नातक म्हणावला जात असे. आजच्या युगामध्ये योगा ला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे त्याचा अधिक अभ्यास करण्याकरता पतंजली योगशास्त्र हा ग्रंथ अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. शारीरिक व्यायाम आणि मानसिक शांती मिळण्यासाठी योग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यासाठी योगशास्त्र हा संस्कृत ग्रंथ अभ्यासणे आवश्यक आहे.

भारतीय परंपरेचा विचार करत असताना अथर्ववेद हा आयुर्वेदाचे जन्मस्थान आहे. तसेच आयुर्वेदामधून अनेक औषधीं उत्पन्न झालेल्या दिसून येतात. अनेक शास्त्रीय ग्रंथ आहे ज्यामधून आपल्याला शास्त्रशुद्ध माहिती कळते त्याचप्रमाणे हस्तलिखित,ताम्रपट, शिलालेख यांसारख्या साहित्य अजूनही प्रकाशित झालेले नाहीत त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शब्दशास्त्र, मानसशास्त्र याला अनुसरून हे ग्रंथ आहेत. भारतीय परंपरा आणि संस्कृत हे दोन्हीही आधारस्थान आहे. भारतीय व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने संस्कृत या विषयाचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञान फक्त शास्त्रीय ज्ञान नाही तर माणसाच्या आयुष्याच्या प्रगतीसाठी हे विशाल दृष्टिकोन प्राप्त होण्यासाठी संस्कृत आणि भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास आवश्यक आहे.

संस्कृतातील नितिशतक हा ग्रंथ व्यक्तीला व्यवहारिक ज्ञान देणारा ग्रंथ आहे. व्यक्तिमत्व विकासाची भारतीय संकल्पना नितिशतक या ग्रंथाद्वारे दिसून येते. नीतिशतक हा जीवनाचा मंत्र शिकवणारा ग्रंथ आहे. भारतीय विचारसरणीच्या पायावर प्रगत झालेली शास्त्र दिसून येतात. समृद्ध भारतीय ज्ञान शुद्ध स्वरूपात हवी असेल तर संस्कृतचा अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही भारतीय शुद्ध ज्ञान म्हणजे संस्कृतमधील ग्रंथ आहे. हस्तलिखित, ताम्रपट असे अनेक ग्रंथ आहे त्याच्यावर काम झालेले नाही. तसेच अनेक शास्त्र आहे. स्थापत्यशास्त्र आहे ज्यावर अजूनही काम झालेले नाही आणि जर त्याचा अभ्यास केला तर नवनवीन संशोधन समोर येतील नवीन नवीन ज्ञान प्राप्त होतील आणि व्यक्ती चा सामाजिक, मानसिक, भौतिक विकास होईल.

भारतीय धारणा मध्ये समृद्ध झालेली भारतीय ज्ञानपरंपरा संस्कृत मध्ये आहे. म्हणून संस्कृत मध्ये संशोधनाची आवश्यकता आहे. भारतीय ज्ञानपरंपरा व संस्कृत आजच्या जगातील दालन आहे. वा.मि. मिराशी हे थोर संस्कृत तज्ञ तसेच इतिहासकार होते. अनेक शिलालेखांचा तसेच ताम्रपटांचा अभ्यास त्यांनी केलेला आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करायचा असेल तर संस्कृत शिवाय पर्याय नाही. काळाच्या ओघात हे मागे पडलेले आहे आणि त्याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतीय ज्ञानाच्या मुळाशी, भारतीय लोकांचा संबंध यावा तसेच आपली संस्कृती अखंड टिकून राहावी या हेतूने भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास करणे पर्यायाने संस्कृतचा अभ्यास करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय विचार पद्धती ही आदर्श आहे.

माणसाच्या सर्व गरजा त्याचे कर्तव्य समाजाप्रती त्याची धारणा हे लक्षात घेऊन या सर्वांचा विचार करून मनुष्याची जीवनशैली ही विकसित झाली आहे. भौतिक, शारीरिक, सामाजिक या सर्वांचा विचार भारतीय ज्ञान परंपरेमधे केलेला दिसून येते. म्हणून भारतीय शिक्षण पद्धती आदर्श शिक्षण पद्धती आहे या दुमत नाही.

## निष्कर्ष

भारतीय ज्ञानापरंपरेचा अभ्यास करायचा असेल तर संस्कृत या ग्रंथाचा सुद्धा अभ्यास करावाच लागेल कारण त्यामधून नवनवीन संशोधन समोर येतील आणि भारत हा देश अजून प्रगतशील दिशेकडे वाटचाल करेल. याबरोबर भारताचाच नाही तर भारतीय लोकांचा सुद्धा विकास होईल.

## संदर्भ

1.प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा - डॉ. अश्विन कुमार राठोड, श्री साईनाथ प्रकाशन

2. शिक्षण तत्व आणि व्यवहार,विनोबा, परंधाम प्रकाशन, पवणार

3. दहा सार्थ उपनिषदे,कै.हरि रघुनाथ भागवते, वरदा प्रकाशन, पुणे

4. निरुक्त,डॉ.प्रज्ञा देशपांडे,भारतीय विचार साधना, नागपूर

5. https://ashutoshareek.com

6.https:www.hindusthansamachar.in